# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक २८/११/२०१८

## गडचिरोली पोलीस दला मार्फत PRYAS (प्रयास) अंतर्गत विर बाबुराव सेडमाके सामान्य ज्ञान स्पर्धेचे शुभारंभ

'प्रयास' उपक्रमाअंतर्गत विर बाबुराव सेडमाके सामान्य ज्ञान स्पर्धेचा प्रभारी पोलीस अधिक्षक, गडचिरोली मा. महेंद्र पंडित यांचे मार्गदर्शनात व मा. डॉ. मोहित गर्ग, अपर पोलीस अधिक्षक, (नक्षल सेल) गडचिरोली यांच्या उपस्थितीतीत शासकीय इंग्रजी आश्रम शाळा, गडचिरोली येथुन शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मा. डॉ. मोहित गर्ग, अपर पोलीस अधिक्षक, (नक्षल सेल) गडचिरोली हे उपस्थित विदयार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, प्रयास उपक्रमाअंतर्गत विर बाबुराव सेडमाके सामान्य ज्ञान परीक्षेबाबत गडचिरोली जिल्हयातील आश्रम शाळेतील विदयार्थ्यांकरीता दररोज १० प्रश्न व्हॉटसप द्वारे पाठविण्यात येतील. सदर प्रश्नांची दैनदिन परीपाठाच्यावेळी विदयार्थ्यांकडून तयारी करुन ३ महीन्यानंतर परीक्षा घेतली जाईल. सदर परीक्षेमध्ये चांगल्या गुणांणी उत्तीर्ण प्रथम ५ येणाऱ्या विदयार्थ्यांसाठी गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे बक्षीस देण्यात येणार आहे. वर्षाच्या शेवटी संपुर्ण आश्रमशाळा करीता एक सामाईक १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या २५ विदयार्थ्यी/विदयार्थीनींना गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येईल. तसेच त्यांनी शालेय जिवनात शिक्षणाचे व स्पर्धा परीक्षेचे महत्व पटवून दिले व विदयार्थ्यांच्या शैक्षणीक समस्या जाणुन घेवून त्याबद्दल योग्य मार्गदर्शन केले. गडचिरोली पोलीस दलातर्फे आयोजित "प्रयास" विर बाबुराव सेडमाके सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विदयार्थी सहभाग होवून प्रशासकीय सेवेतील विवीध क्षेत्रात जावून गडचिरोली जिल्हयाचा विकास करावा असे प्रतिपादन त्यांनी केले. या प्रसंगी बक्षीसांचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमात **PRYAS** (प्रयास) उपक्रमाबाबत पोउपनि अतुल खंदारे प्रभारी अधिकारी, नागरी कृती शाखा गडचिरोली यांनी सविस्तर रुपरेषा समजावून सांगितली. श्री लांडे, सहाय्यक शिक्षक यांनी शासकीय इंग्रजी आश्रम शाळा, गडचिरोली व एकलव्य शाळेबाबत माहिती दिली. सदर शाळेच्या मुख्याधापीका कु. जुमनाके यांनी सदर उपक्रमात जास्तीत जास्त विदयार्थी/विदयार्थीनी सहभागी होउन गडचिरोली जिल्हयामधुन प्रशासकीय अधिकारी घडविता येईल असे आपल्या मनोगतात मध्ये व्यक्त केले.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शासकीय इंग्रजी आश्रम शाळा, गडचिरोली येथील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी व नागरी कृती शाखा गडचिरोली चे प्रभारी अधिकारी अतुल खंदारे व कर्मचारी जमीलखॉ पठाण व रविंद्र कंकलवार यांनी प्रयत्न केले.